**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**

जुनी इमारत, ७ वा मजला, भूमि व मिळकत शाखा, प्लॉट क्र. सी-१४ व सी-१५,
ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१,
दुरध्वनी क्र. ०२२-६५९६७४०३.
वेबसाईट : https://mmrda.maharashtra.gov.in
ई-मेल : **land**@mailmmrda.maharashtra.gov.in


# कार्यालयाकरीता जागा हवी आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या, रायगड जिल्ह्यातील के.एस.सी. नव नगर विकास प्राधिकरण/नेरळ अधिसूचित क्षेत्र/कर्जत अधिसूचित क्षेत्र/पोयनाड अधिसूचित क्षेत्र तसेच अलिबाग अधिसूचित क्षेत्र या करीता रायगड जिल्ह्यातील, पेण शहरातील मध्यवर्ती भागात सुमारे ५००० निव्वळ चटई क्षेत्र असलेली जागा/इमारत ६० महिन्यांच्या भाडेपट्टा कराराने प्रतिमाह भाडे तत्वावर पाहिजे आहे.

यासाठी इच्छुक जागामालक/इमारत मालकांकडून खालील तपशीलांसह प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

१. सदर जागा कार्यालयीन वापरासाठी योग्य व कायदेशीरदृष्ट्या वापरण्यायोग्य असावी.
२. इमारतीमध्ये आवश्यकतेनुसार पाणी, वीज, स्वच्छतागृह, लिफ्ट, पार्किंग व अग्निसुरक्षा व्यवस्था उपलब्ध असावी.
३. कार्यालयास ये-जा करण्यासाठी जागा सुलभ व सार्वजनिक वाहतुकीने सहज उपलब्ध असावी.
४. जागेचे मालकी, मालकी हक्काचा पुरावा/मालमत्ता पत्रक/ मालमत्ता कर भरल्याची प्रत व इतर आवश्यक कागदपत्रे असणे आवश्यक आहे.
५. जागेचा/इमारतीचा मंजूर आराखडा व क्षेत्रफळ, सदर जागेचा वापर वाणिज्य/कार्यालयासाठी करण्यास सक्षम प्राधिकरणाची/स्थानिक प्राधिकरणाची आवश्यक परवानगीची प्रत सादर करावी. तसेच इतर संबंधित कागदपत्रे सादर करावीत.
६. अपेक्षित भाडे, देखभाल खर्च, कर व इतर आकारणी यांचा स्वतंत्र तपशील प्रस्तावात नमूद करावा.
७. भाडेकराराचा कालावधी ५ वर्षे राहील. कराराच्या अटी शासनाच्या प्रचलित नियमांनुसार राहतील.
८. जागेची पाहणी व प्रस्तावांची छाननी केल्यानंतर मा. महानगर आयुक्त यांचे मान्यतेने जागा भाड्याने घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.
९. इच्छुक व्यक्तींनी खालील प्रमाणे अर्ज सादर करावे;
१०. सोबत जोडलेल्या नमुन्या प्रमाणे अर्ज सादर करावा
११. लिफाफा क्र. १: तांत्रिक माहिती आणि कागदपत्रे (Technical Details and Documents)
१२. लिफापा क्र. २: अपेक्षित भाडे, देखभाल खर्च, कर व इतर आकारणी. (Financial Quotation) -
१३. उपरोक्त लिफापा क्र. १ आणि २ स्वतंत्रपणे बंद करून उपरोक्त अर्जाच्या नमुन्या मध्ये अर्ज भरून उपरोक्त नमूद पत्त्यावर पाठवण्यात यावे.

इच्छुक जागामालकांनी आपले प्रस्ताव ३०/१०/२०२६ रोजी सायं. ०५:०० वाजेपर्यंत उपरोक्त पत्त्यावर बंद लिफाफ्यात सादर करावेत.

**<u>प्रस्ताव सादर करण्याबाबतचा अर्ज :</u>**

**क: ______ ऑक्टोबर, २०२६**

**प्रति,**

**मा. महानगर आयुक्त,**

मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण.
नवीन प्रशासकीय इमारत ई ब्लॉक बीकेसी,
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र ४०० ०५१

**विषय: प्राधिकरणाच्या मौजे पेण, जिल्हा रायगड येथे उप प्रादेशिक कार्यालय करीता जागा भाड्याने घेणेबाबत.**

**संदर्भ:** प्राधिकरणाची कार्यालयीन जागे करीता दिनांक १६ ऑक्टोबर, २०२६ रोजीची जाहिरात

मा. महोदय,

प्राधिकरणाच्या उपरोक्त संदर्भित जाहिरातीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यालयीन जागा भाड्याने देण्याचे प्रस्ताव सादर करित आहे;

नाव (अर्जदार/ जागा मालक): ____________________________________________

जागेचा पत्ता: ________________________________________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

जागेचे क्षेत्र: ____________________________/ चौ. फूट

आपला विश्वासू

(नाव/ सही)
मोबाईल क्र.

**सोबत:** लिफाफा क्र. १ व २

**लिफापा क्र. १ : तांत्रिक माहिती आणि कागदपत्रे (Technical Details and Documents)**

| अ.क्र. | आवश्यक तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | भाड्याने द्यावयाचे जागेचे एकूण क्षेत्रफळ (चटई क्षेत्र) | ________चौ. फूट. |
| २. | इमारतीचे स्वरूप वाणिज्य / रहिवासी + वाणिज्य | |
| ३. | पोहच रस्त्याची रुंदी | ______ फूट. |
| ४. | स्वतंत्र इमारत आहे किंवा कसे | आहे /नाही |
| ५. | स्वतंत्र इमारत नसल्यास सदर जागा कुठल्या मजल्यावर आहे | |
| ६. | स्वत्रंत प्रवेश द्वार उपलब्ध आहे किंवा कसे | आहे /नाही |
| ७. | निर्धारित पार्किंग जागा उपलब्ध आहे किंवा कसे | आहे /नाही |
| ८. | उपलब्ध पार्किंग क्षेत्र | |
| ९. | कार्यालयीन वापरासाठी नियमित वीजपुरवठा आणि जनरेटर बसवण्यासाठी व जोडण्यासाठी जागा आहे किंवा कसे | आहे /नाही |
| १०. | नियमाप्रमाणे इमारतीमध्ये कायदेशीर अग्निसुरक्षा, भूकंप/पूर प्रतिरोधकता, संपूर्ण विमा संरक्षण इत्यादी आहे किंवा कसे | आहे /नाही |
| **खालील कागदपत्रे सोबत जोडण्यात यावे** | | |
| ११. | जागेचे मालकी हक्काचा पुरावा/मालमत्ता पत्रक/ मालमत्ता कर भरल्याची प्रत | |
| १२. | इमारतीचा मंजूर आराखडा आणि परवानगी प्रत | |
| १३. | सदर जागेचा वापर वाणिज्य/कार्यालयासाठी करण्यास सक्षम प्राधिकरणाची/स्थानिक प्राधिकरणाची आवश्यक परवानगीची प्रत | |
| १४. | इमारतीमधील भागशः जागा उपलब्ध असल्यास सदर जागा आणि स्वच्छतागृह इत्यादी बाबी दर्शविणारा नकाशा | |
| १५. | उपलब्ध जागेचे तसेच इमारतीचा परिसर दाखवणारे छायाचित्र | |

**घोषणापत्र:**

मी याद्वारे घोषित करतो/करते की, माझ्याद्वारे अर्जात दिलेली वरील सर्व माहिती, तपशील आणि सादर केलेली कागदपत्रे माझ्या पूर्ण माहितीनुसार सत्य, अचूक आणि बरोबर आहेत. भविष्यात यात कोणतीही माहिती खोटी, चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, माझा अर्ज रद्द करण्यास मी पूर्णपणे पात्र राहीन आणि माझ्यावर होणाऱ्या कायदेशीर कारवाईस मी स्वतः जबाबदार असेल.

अर्जदाराची स्वाक्षरी: ______________________

अर्जदाराचे नाव: __________________________

दिनांक: ____/_____/________

स्थळ: ____________________________

**लिफाफा क्र. २ : अपेक्षित भाडे, देखभाल खर्च, कर व इतर आकारणी.(Financial Quotation)**

**प्रति**

**मा. महानगर आयुक्त**

मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण
नवीन प्रशासकीय इमारत ई ब्लॉक बीकेसी,
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र ४०० ०५१

**विषय: प्राधिकरणाच्या मौजे पेण, जिल्हा रायगड येथे उप प्रादेशिक कार्यालय करीता जागा भाड्याने घेणेबाबत.**

**संदर्भ:** प्राधिकरणाची कार्यालयीन जागे करीता दिनांक ______ सप्टेंबर, २०२६ रोजीची जाहिरात

मा. महोदय,

प्राधिकरणाच्या उपरोक्त संदर्भित जाहिरातीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यालयिन जागा भाड्याने देण्याच्या अनुषंगाने अपेक्षित भाडे, देखभाल खर्च, कर व इतर आकारणी बाबत प्रस्ताव सादर करित आहे;

| अ.क्र. | आवश्यक तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | अपेक्षित भाडे (₹ ___/ चौ. फूट/महिना) | ₹ _________/ चौ. फूट/महिना |
| २. | देखभाल खर्च, कर व इतर स्थानिक आकारणी | ₹ ________/ चौ. फूट/महिना |

आपला विश्वासू

(नाव/ सही) मोबाईल क्र.

**टिप :-** कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे अथवा नाकारणे तसेच कोणतेही कारण न देता प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

तसेच अधिक माहितीसाठी डॉ. प्रियंका पाटील, पदनाम: भूमी व मिळकत व्यवस्थापक, यांच्याशी संबंधित जाहिरातीकरीता आवश्यकता असल्यास दूरध्वनी क्र. ०२२-६५९६७४०३ येथे संपर्क साधावा.

**दिनांक :** ___/१०/२०२२६

**स्थळ : बांद्रा मुंबई.**

**सही/-**

**(उप महानगर आयुक्त)**